# प्रसिद्धीपत्रक

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) २०१९
## परीक्षा दिनांक १९ जानेवारी २०२०
## अंतिम उत्तरसूची

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार दि.१९/०१/२०२० रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतरिम उत्तरसूची दि.०१/०२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रमांक १ व पेपर क्रमांक २ च्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे सोमवार दि.१०/०२/२०२० अखेरपर्यंत पाठविणेबाबत दि.०१/०२/२०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

या अंतिम उत्तरसूचीनुसार MAHATET - 2019 परीक्षेचा निकाल यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

पुणे, दि. २४/०२/२०२०

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.